MHKO070016712021

**न्यायनिर्णय**

(घोषित दिनांक– ०३ जुलै, २०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.५५२/२०२१** **निशाणी क्र.८/ब लगत**

**(जयसिंगपूर पोलीस ठाणे गु.र.नं.२०७/२०२१)**

**गुन्हयाचा सारांश –** महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई), भारतीय दंड संहितेचे कलम २६९,२७० प्रमाणे.

=========================================

श्रीमती पाराज–पाटील, सहाय्यक सरकारी अभियोक्ता सरकार पक्षातर्फे

श्री.एस.डी.जगदाळे वकील आरोपीतर्फे

=========================================

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) व भारतीय दंड संहितेचे कलम २६९, २७० नुसार शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**०२.** अभियोगपक्षाची हकिकत, पुरावा व उभय पक्षांच्या वकिलांच्या युक्तिवादानंतर माझ्या विचाराधीन आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी हा दिनांक १५/०५/२०२१ रोजी १६.४५ वाजणेच्या सुमारास चिपरी गावचे हददीत सुतार गल्ली येथे राहते घराचे पाठीमागे उघडयावर ता.शिरोळ येथे विनापरवाना, बेकायदेशीर रित्या विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या स्वतःच्या फायदया करीता सोबत बाळगून मिळून आला हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | ...नाही |
| २. | उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी हा तोंडावर मास्क | ...नाही |

| | | |
|---|---|---|
| | अथवा रुमाल न लावता वर्दळीच्या ठिकाणी फिरुन लोकांना कोरोणा विषाणूचा प्रसार होऊन मानवी जिवीत्व/आरोग्य धोक्यात येईल अशी कृती केली हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | |
| ३. | उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपी हा टाळेबंदीच्या काळामध्ये कोरोणा रोगाचा संसर्ग व प्रादुर्भाव वाढत असताना वर्दळीच्या ठिकाणी फिरुन मानवी जीवीतास धोका निर्माण होईल असे कृत्य केले हे अभियोगपक्षाने सिध्द केले काय ? | ...नाही |
| ४. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**०३.** आरोपीविरूध्द ठेवलेला आरोप सिध्द करण्याकामी अभियोग पक्षाने केवळ एक साक्षीदार पंकज सुरेश संकपाळ (सा.क्र.१) या पंचाची साक्ष नि.८ सोबत नोंदविली. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवूनही त्यांनी इतर साक्षीदार हजर न केल्याने नि.१ वरील आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. अभियोगपक्षाच्या पुराव्यात आरोपीविरूध्द दोषार्ह मजकुर न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन वगळण्यात आले. याउलट आरोपीने आपल्या बचावार्थ तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दिला नाही.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ३ करिता</u>**

**०४.** मुद्दे क्र.१ ते ३ हे एकमेकांशी निगडीत व एकाच घटनेतील भाग असल्याने त्यांची एकत्रीत चर्चा करणे सोईस्कर होईल. सा.क्र.१ पंकज सुरेश संकपाळ यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी त्याच्या सरतपासामध्ये कथन केले आहे की, दिनांक १५/०५/२०२१ रोजी पोलीसांनी त्यांना कोठे बोलावले होते हे त्यांना आठवत नाही तसेच पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा केला नव्हता असे कथन केले. पंचनाम्यावरील अनुक्रमांक १ वर त्यांची सही आहे. परंतू त्यातील मजकूराविषयी त्यांना

माहिती नसल्याचे तसेच आरोपीस देखील ते ओळखत नसल्याचे त्यांनी कथन केले आहे. अभियोगपक्षातर्फे सदर साक्षीदारास भारतीय पुरावा अधिनियम १८७२ च्या कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारले असता अभियोगपक्षाच्या लाभात कोणताही कबुली जबाब त्यांच्या मुखातुन मिळू शकला नाही. त्यांनी त्यांच्या समक्ष आरोपीने बाळगलेल्या मालातून दारू जप्त केल्याचे सांगितले नाही.

**०५.** आरोपीने बचावाकरीता, सदर माल आरोपीने बाळगलेल्या मालातून जप्त केला याबाबत साक्षीदार सांगत नाही. तसेच अभियोगपक्षाने सदर माल हा आरोपीने बाळगलेल्या मालातून जप्त केल्याचे जप्ती पंचनाम्याव्दारे सिध्द केले नाही, त्यासोबतच अभियोगपक्षाने फिर्याद व जप्ती पंचनाम्यामधील मजकूर सिध्द केला नाही. तसेच अभियोगपक्षाने रासायनिक विश्लेषकाचा अहवाल सिध्द केला नाही, त्यामुळे आरोपी शिक्षेस पात्र नाही, असा युक्तीवाद आरोपीच्या विधिज्ञांनी केला.

**०६.** अभियोगपक्षाचे कथन आहे की, जप्त केलेला माल हा रासायनिक पृथक्करणासाठी रासायनिक विश्लेषक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कोल्हापूर येथे पाठविलेला आहे. तथापि, अत्यंत महत्वाचे असे की, त्याअनुषंगाने अहवाल अभियोगपक्षाने अभिलेखावर सिध्द केला नाही. त्यामुळे अभिकथीत जप्त केलेले द्रव हे प्रतिबंधित केलेले मादक द्रव होते व आहे असे शाबीत होत नाही. न्यायाचे तत्व आहे की, अभियोगपक्षाने आरोपीच्या विरुध्दचे आरोप सबळ पुराव्याद्वारे व योग्य संशयाच्या पलिकडे जावुन सिध्द करणे गरजेचे आहे. अभियोगपक्षाच्या पुराव्यामध्ये विसंगती आल्यास त्याचा लाभ आरोपीस मिळतो. याउलट, आरोपीस निर्दोषत्व सिध्द करण्याकरिता पुरावा सादर करण्याची आवश्यकता नाही. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवूनही त्यांनी इतर साक्षीदारांना साक्षीकामी हजर ठेवुन तपासले नाही. अभियोगपक्षाने असा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सिध्द केला नाही, जेणेकरुन हे सिध्द होईल की, आरोपी हा अभिकथित वेळी व ठिकाणी त्याच्या ताब्यात विनापरवाना व बेकायदेशिरपणे अभिकथित मुद्देमाल बाळगून आढळून आला होता. प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने फिर्याद व जप्ती पंचनामा हा सिध्द केला नाही. जप्ती पंच यांनी अभिकथित मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यात आढळल्याचे कथन केले नाही. जप्ती पंच यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. तसेच मा.जिल्हाधिकारी यांच्या ज्या आदेशाचा भंग झाला तो आदेश अभियोग पक्षाने अभिलेखावर सिध्द केला नाही.

आरोपीने नेमकी कोणती कृती केली याबाबत पुरावा नाही. सबब, अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) व भारतीय दंड संहितेचे कलम २६९, २७० अन्वये गुन्हा सबळ व पुरेशा पुराव्याअभावी सिध्द केलेला नसल्याने आरोपीला संशयाचा फायदा देणे न्यायोचित असून तो सदर गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नाही असे नोंदवित आहे व मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीप्रमाणे आदेश पारित करत आहे –

## :: आदेश ::

१. आरोपी **कुमार आण्णासो यादव** रा.सुतार गल्ली, चिपरी ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) व भारतीय न्याय संहिताचे कलम २६९, २७० अंतर्भुत वर्णिलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५५ (१) मधील प्रावधानीत तरतुदीनुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येतो.

३. अभिकथीत जप्त मुद्देमाल बाबत संबंधित पोलिस स्टेशन यांनी अपील कालावधीनंतर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम १०१ प्रमाणे कार्यवाही करावी.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे रक्कम रु.१५,०००/– (रुपये पंधरा हजार मात्र) चा वैयक्तीक जातमुचलका व तितक्याच रक्कमेचा जामीन कदबा दयावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात देण्यात व घोषीत करण्यात आला)

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.07.03 16:08:34 +0530

**(अ. त्रिं. मनगिरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,न्यायालय क्र.२
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.

दिनांक: ०३/०७/२०२६

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri.C.N.Kumbhar |
| Name of Court | 2nd Joint C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 03/07/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 03/07/2026. |
| Judgment/order uploaded on | 03/07/2026. |